# हासती मुले जिथे....
# गरवारे बालभवनची रौप्यमहोत्सवी वाटचाल

कल्पना संचेती

## रौप्यमहोत्सवी वाटचाल

‘गरवारे बालभवन’ माहित नाही अशी व्यक्ती पुण्यात सापडणार नाही इतकं ते सर्वसामान्यांपर्यंत पोहोचलंय. आजच्या पुण्याच्या परिस्थितीचा विचार करता २५ वर्षांपूर्वी उचललं गेलेलं हे पाऊल किती महत्त्वाचं होतं हे जाणवतं. या २५ वर्षांत अनेक अडचणींना सामोरं जात अनेकांच्या सहकार्याने गरवारे बालभवनने ही दमदार वाटचाल केलेली आहे. पुण्याला अभिमान वाटावा अशी एक ‘चळवळच’ इथे मुलांसाठी उभी राहिली. ज्या समाजात सर्वसामान्य मुलांसाठी, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी काहीतरी केलं जातं तो समाज हा खरा ‘दूरदर्शी’ समाजच म्हणावा लागेल.

बदलत्या जीवनप्रवाहाचा वेध घेत, भविष्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरतील अशा योजना जेव्हा समाजातली जाणती मंडळी अधिकारी मंडळी आखतात, तेव्हा त्यावेळी साध्या वाटणाऱ्या गोष्टींमागे आजचे वास्तव बघता केवढा मोठा विचार होता, अभ्यास होता, परिस्थितीचं अचूक आकलन होतं, असं वाटून अश्या सर्वांया बाबतीत मनात कृतज्ञता दाटून येते. शहरातली :मध्यवर्ती’ जागा मुलांसाठी नुसती राखून ठेवणंच नाही तर तिची सूत्र योग्य व्यक्तीच्या शोभाताई भागवतांच्या हाती सोपवण्याचं कामही तितकंच महत्त्वाचं होतं. नाहीतर ढीगावारी योजना बनतात, त्यासाठी जागा ठेवल्या जातात, कुंपण, गेट, इमारत तयार असते, पदाधिकारी असतात आणि आत मात्र काहीही लोकोपयोगी काम चालत नाही. किंवा चाललं तरी ते फार वर्षे टिकूनहू राहत नाही हे दृश्य सर्वत्र बघायला मिळतं. बालभवनचं काम मात्र आजही जोरात चालू आहे.

गरवारे बालभवनच्या दृष्टीनी १९७९ साल महत्त्वाचं होतं. ते वर्ष हे ‘आंतरराष्ट्रीय बालक वर्ष’ म्हणून घोषित झालं होतं. त्यावेळचे पुण्याचे कमिशनर डॉ. पु. सं. पाळंदे यांना त्या निमित्ताने पुण्यात मध्यवर्ती जागी मुलांसाठी काहीतरी उपक्रम सुरू व्हावा असे वाटत होते. त्यांनी उद्योगपती मा. श्री. आबासाहेब गरवारे यांना या उपक्रमासाठी सहकार्याची विनंती केली. त्यांनी चार–पाच वर्षे त्या दिशेनी (इरमारत सोडून) प्रत्यक्ष काही घडले नाही. परंतु शेवटी १ सप्टेंबर १९८५ रोजी पुणे महानगरपालिका आणि गरवारे ट्रस्ट या दोघांच्या सहकार्याने



डॉ. श्यामला वनारसेंच्या मार्गदर्शनाखाली आणि सल्ल्याप्रमाणे मा. शोभा भागवतांच्या हाती या उपक्रमाची सूत्रं देण्यात आली आणि आजचं बालभवन सुरू झालं.

आ. शोभाताई भागवत यांनी बालभवनच्या संचालिका म्हणून मुलांच्या विश्वात चौफेर काम केलं. सारसबागेसोरचं बालभवन तर हजारो मुलांचं रोजचं लाडकं ठिकाण झालंय. परंतु बालभवनला तिथपर्यंतच मर्यादित न ठेवता बालभवन ही ‘संकल्पना’ त्यांनी विशाल केली. पुण्यात आणि महाराष्ट्रात तिची ‘चळवळ’च उभी केली आणि शहरांमध्ये ग्रामीण भागामध्ये ठिकठिकाणीं बालभवनं’ उभी राहिली. त्याबरोबर अनेक ‘बालकारणी’ मंडळीही एकत्र आली. १९८५ साली लावलेल्या रोपाचं आता डेरेदार वृक्षांत रूपांतर झालंय.

## काळाची गरज

बालभवन ही आत्ताच्या काळाची गरजच बनली आहे. गेल्या काही वर्षात जागतिकीकरणाचे वारे सगळीकडेच जोरात वाहू लागले. सांस्कृतिक पुण्याला आता माहिती तंत्रज्ञानाचा नवा चेहरा मिळालायं. पुण्यात येणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढती आहे. पुणे चहुबाजूंनी पसरतंय, वाढतंय. कुटुंब छोटी झाली. घरातले आई–बाबा कामाच्या निमित्ताने दिवसभर बाहेर असण्याचं प्रमाण वाढलंय. सर्वच क्षेत्रात ‘अर्थ’कारण महत्त्वाचं ठरलंय. माणूस अधिकाधिक आत्मकेंद्री बनय चाललाय. मुलांचा विचार करायला योग्य माणसं आणि वेळ दोन्हींची कमतरता भासती आहे. दुसरीकडे याचा परिणाम म्हणून शाळांनीही कात टाकलिए. शिक्षण महागडं झालं. त्यात दिखाऊ गोष्टींचीच भर पडत गेलीए. यामुळे मुलांसाठी खरं काय गरजेचं आहे, काय योग्य आहे ही स्पष्टता कमी होते आहे. म्हणूनच बालभवनचं उद्दिष्ट आहे की ‘शाळेत आणि घरी मुलांना जे आनंदाचे अनुभव मिळू शकत नाहीत ते देण्यासाठी बालभवनसारखी केंद्र जागोजागी असावीत आणि ती बालकप्रेमी मंडळींच्या हातात असावीत.

शोभाताई म्हणतात, केवळ उपयुक्त, आवश्यक एवढ्याच गोष्टींमध्ये मुलांना बंदिस्त करून चालत नाही. मुलांच्या व्यक्तिमत्त्वाला हवा विशाल पाया. आनंदाच्या अनुभवांचा मोकळेपणाने प्रयोग करण्याचा, स्वत:ला काय येतं ते अजमावण्याचा, हातांनी खूप गोष्टी करण्याचा, आजुबाजुच्यांनी प्रेमानी समजून घेण्याचा, एकमेकांना काही देण्याचा. आणि या पायालाही पाया लागतो विश्वासाचा, स्वातंत्र्याचा, सन्मानाचा, प्रेमाचा, सृजनशील वातावरणाचा! इथे शाळेनंतर जी मुलं येतात ती आनंदानी व्यायाम करण्यासाठी, गमतीचे खेळ खेळण्यासाठी, अनेक सणांच्या, कार्यक्रमाच्या निमित्ताने चित्रं काढण्यासाठी, मनमुराद गोष्टी सांगण्यासाठी, अमूकच गोष्ट पाहिजे असा ताईजवळ ‘हट्ट’ करण्यासाठी, आपल्या वयाला शोभणारी गाणी गाण्यासाठी, तऱ्हतऱ्हेचे नाच करण्यासाठी, कधी श्रमदान, कधी स्वयंपाक, कधी सहली, कधी पक्षी बघणं, कधी शेती करणं, कधी कारखाने पाहणं अशा कितीतरी गोष्टीतून अनुभवसंपन्न होण्यासाठी!

'बालभवन' म्हणजे नुसतं मैदान नाही, क्रीडासंकुलनाही, संस्कार वर्ग नाही किंवा छंदवर्गही नाही. या सर्वांच्या पलीकडे जाऊन मुलांच्या मनाचा, शरीराचा, बुध्दीचा विकास करण्यासाठी काम करणारं हे रंजन केंद्र आहे. म्हणूनच इथल्या 'वातावरणाला' खूप महत्त्व आहे. कारण शिकवून, सांगून होतं ते 'शिक्षण' आणि वातावरणातून मूलं जे सहज उचलतं त्यालाच आपण 'संस्कार' म्हणतो. असे कितीतरी संस्कार बालभवनच्या वातावरणातून मुलांवर सहजपणे होतात. हे वातावरण तयार करण्यासाठी, टिकवण्यासाठी शोभाताईंनी खूप प्रयत्न केलेत. त्यातूनच बालभवनच्या कितीतरी कार्यकर्त्या तयार झाल्या. त्या कार्यकर्यांच्यातले सूप्त गुण बाहेर आले. त्यानेच कामातली विविधता टिकली. मुलांबरोबर काम करताना या सगळ्या गोष्टींचं भान असणं खूप महत्त्वाचं आहे. तेव्हाच ते वातावरण चैतन्यमय राहतं. त्याच्यात साचलेपण येत नाही.

अशा 'मुलांच्या' संस्था कुठल्याही धार्मिक, राजकीय विचारधारापांसून मुक्त कराव्या लागतात. आज बालभवन तसंच आहे. म्हणून बालभवनच्या मूळावर जेव्हा जेव्हा प्रहार केले गेले तेव्हातेव्हा समाजातल्या जागरूक नागरिकांनी, बालभवनच्या पालकांनी, सर्व बालकारणी मंडळींनील मुलांने असे प्रयत्न हाणून पाडले. पालक – मुलं – कार्यकर्ते सर्वांना बालभवन 'आपलं' वाटतं. जंगलं तुटायला लागली की सरकार जंगलाचे काही भाग आरक्षित म्हणून घोषित करतं ते तिथल्या झाडांसाठी, प्राणी, पक्षी, किटकांसाठी, तिथे राहणाऱ्या आदिवासींसाठी! त्याचप्रमाणे सर्वत्र मोकळ्या जागा व्यापारी कारणांसाठी गिळंकृत होत असताना आत्ताच समाजानू अश्या अधिकाधिक मोकळ्या जागा मुलांसाठी आरक्षित करण्याचा आग्रह धरला पाहिजे. नाहीतर मुलांना खेळायला जागाच उरणार नाही.

## अनेक मुलांचं 'आपलं' बालभवन

बालभवनमध्ये सर्वसामान्य मुलांबरोबर विशेष गरजा, प्रश्न असणारी कितीतरी मुलं येतात. सर्वांबरोबर खेळतात, म्हणून तर कितीतरी डॉक्टर्स, समुपदेशक मुलांचे प्रश्न जाणवले की मुलांना संध्याकाळी बवलभवनला पाठवा असा सल्ला देतात. अशा येणाऱ्या मुलांना समवयस्क मित्र भेटतात, सन्मानाची वागणूक मिळते. ह्यामुळे त्यांच्यात सकारात्मक बदल होताना दिसतात. मोकळ्या–हवेशीर वातावरणानी मुलांची प्रतिकारशक्तीही वाढते. आरोग्य सुधारते, चंचलता कमी होते. असं अनेक वर्षांच्या कामातून अनुभवाला येतंय.

पहिल्या काही वर्षांत बालभवनमध्ये खेळायला आलेली मुलं आता मोठी झाली आहेत. काही जण आई–बाबा झाले. त्यातले कित्येक जण बालभवनचे आता 'पालक' आहेत. याशिवाय बालभवनमध्ये खेळलेली काही मुलं आता इथे बालभवनच्या ताई–दादा म्हणूनही काम करताहेत. बालभवनमधल्या आजी झालेल्या ताईंची नातवंडंही इथे खेळताहेत. बालभवनच्या उपक्रमात 'ताजेपण' हेच त्याचं कारण आहे.



मध्यंतरी काही वर्षे दांडेकर पूलाजवळच्या वस्तीतून खूप मुली यायच्या. त्याही इतक्या रमल्या की बालभवनच्याच झाल्या. पुणं विस्तारलं आणि विविधभाषी मुलं इथे यायला लागली. बालभवनमध्ये येणाऱ्या मुलांच्या कानावरुन त्यामुळे सहज दोन–तीन भाषा जातात. मराठी 'न' बोलणारी मुलं चांगलं 'मराठी' बोलायला लागतात. मग पालक मंडळीही खूष होतात. तर मराठी बोलणाऱ्या मुलांना थोडं थोडं हिंदी, इंग्रजी समजायला लागतं. मुलांना बालभवन इतकं आपलं वाटतं की त्यांना अजिबात बालभवन सोडायचं नसतं. परंतु 'स्पेशलायझेशन'च्या रेट्यामुळे कधीकधी पालक मुलांना समजून घेताना कमी पडतात.

खूप वर्षांपूर्वी घडलेला एक प्रसंग मला आठवतो. एका ९–१० वर्षाच्या मुलाची आई बालभवनमध्ये त्याला न्यायला आली. बोलता–बोलता म्हणाली, 'आता मी ह्याला पोहायच्या क्लासला टाकते, आणि बालभवन बंद करते, तो मुलगा लगेच आईला म्हणाला, ''आई पोहणं आणि बालभवन हे वेगळं आहे गं! तिथे म्हणजे पोहण्यालाही अभ्यासासारखं 'बोअर' करून टाकतात. छान पोहू सुध्दा देत नाहीत. मला बालभवनलाच यायचंय.

मुलांचा, पालकांचा बालभवनला सतत वाढता प्रतिसाद मिळतो आहे. इथे अभ्यासक्रम नाही, परीक्षा नाहीत, स्पर्धा नाही, पास–नापास नाही, शाळेसारखं कुठलंही कम्पलशन नाही, तरीही पालकांना आपल्या मुलांना बालभवनमध्ये प्रवेश मिळावा असं वाटतं ह्यातंच बालभवनचं यश आहे.

## विस्तारणार काम

बालभवनच काम हे एकाच जागी थांबलेलं नाही. मुलांच्या संबंधी जे जे म्हणून महत्वाचं आहे ते ते ओळखून बालभवनने कामाची दिशा ठरवत नेली. पुण्यात एकच एक बालभवन 'स्पेशल' म्हणून वाढवण्यात शोभाताईंना रस नव्हता. जागोजागी बालभवनं उभी राहावीत आणि त्या त्या भागातल्या मुलांना तिथे जाता यावं म्हणून 'कार्यकर्ता' प्रशिक्षण सुरू केलं. आत्तापर्यंत वर्षातून दोनदा अशी पन्नासच्या वर प्रशिक्षण बालभवननं घेतली. जवळपास चार–पाच हजारांवर कार्यकर्ते बालकप्रेमी मंडळी इथे येऊन प्रशिक्षण घेऊन गेली. काहींनी मग आपापल्या जागी बालभवनं सुरू केली. दिवसेंदिवस मुलांच्या दृष्टीने बालभवनची गरज वाढतीच आहे. त्यामुळे जी माणसं पुण्यात येऊन प्रशिक्षण घेऊ शकत नाहीत त्यासाठी त्यांच्या गावी बालभवन कार्यकर्त्यांनी 'बालभवन प्रशिक्षण' घेतली आहेत. वेगवेगळ्या सोसायट्यांमधून शाळेच्या मैदानावर शंभर तरी 'बालभवनं' पुण्यात सुरू झाली आहेत. कधी सोसायटीतले लोक, कधी मोठी मुलं, कधी सोसायटीचे पदाधिकारी यांच्याकडून इथे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना त्रास होतो. कधी आर्थिक कारणांवरुन, कधी मुलांचा आवाज होतो म्हणून तर कधी इतरही काही कारणांसाठी... खरं तर असं वाटतं की, सर्व सुजाण नागरिकांनी मलांची सद्यस्थिती बघता मुलांच्या विकासाला, वाढीला आकार देणारे हे

बालभवन सारखे प्रयत्न चालू ठेवायला मदतच करायला हवी. तेच समाजाच्या हिताचं आहे. मुलं निरोगी वाढली, घडली तर पुढच्या भविष्यात भारत सुदृढ, निरोगी घडेल!

वेगवेगळ्या ठिकाणी सुरू झालेल्या बालभवनांचे कार्यकर्तेही मधेमधे एकत्र भेटतात. एकमेकांच्या अडचणी समजून घेतात. एकमेकांकडून शिकतात. त्यांचाही एक मोठा समूह तयार झाला आहे.

**शिबिरं**

विविध प्रकारची शिबिरं इथे वर्षभर चालतात. शिवाय एप्रिल–मे महिन्यातली शिबिरंही चालतात, उदा. चालत चालत पुणे बघू, खुल जा सिम सिम, वाचनाचं प्रेम, गंमत शिबिर, निवासी शिबिर इ. त्यावेळी पुण्याबाहेरील मंडळी खास बालभवनच्या शिबिरांसाठी पुण्यात येतात.

सध्या 'आईचं शेपूट' म्हणून ३ वर्षांच्या आतल्या मुलांसाठी एक उपक्रम चालू आहे. त्यात लहानग्यांबरोबर आईबाबांनाही शिबिरात यायचं असतं. तेही शिबिर खूप लोकप्रिय होतंय. पालकांसाघी पालकशाळा, पालक शिबिरं असतात. शोभाताई–अनिल भागवत हे शिबिर घेतात. 'पालकत्वा'चा त्यांचा दोघांचा खूप अभ्यास आणि अनुभव आहे. त्याचाही फायदा अनेक पालक घेतात. लहान मुलांना वाढवताना पालकांना अश्या शिबिरांची खूप मदत होते. याखेरीज स्केटिंग, तबला, नृत्य असेही काही वर्ग चालू आहेत. वेगवेगळ्या संस्थांमध्ये राहणाऱ्या मुलांना उदा. सेवाग्राम, बालग्राम, रिमांड होम दिवाळीच्या निमित्ताने बोलभवनमध्ये बोलावलं जातं, त्यांना खाऊ दिला जातो, त्यासाठी कार्यक्रमही केला जातो.

**प्रकाशन**

मुलांसाठी चांगलं साहित्य हवं म्हणून जगभरातलं काही चांगलं साहित्य निवडून त्याची भाषांतर करून बालभवनने प्रकाशित केली ओहत. वैज्ञानिक अरविंद गुप्ता यांच्या प्रेरणेने हे कामही खूपच वाढलंय. 'कजा कजा मरू' असं या प्रकाशनाचं नाव आहे. अगदी अल्प किंमतीत बालभवनने ही पुस्तकं मुलांसाठी उपलब्ध करून दिलेली आहेत.

बालभवनमध्ये मुलांसाठी आणि पालकांसाठी वाचनालयही आहे. सगळी मिळून आठ ते दहा हजार पुस्तकं वाचनालयात आहेत. महिना दहा रुपये इतकी कमी फी मुलांकडून घेतली जाते. तीन–चार वर्षांची छोटीमुलंही वाचनालयात येऊन आपापली पुस्तकं निवडून घेऊन जातात हे बघताना खूप मजा वाटते.

मुलांच्या गाण्यांच्या दोन ध्वनिफिती 'इवली इवली चांदणी' आणि 'झुळझुळ गाणी' बालभवनने काढल्या आहेत. त्यामुळे छान छान गाणी मुलांच्या घरोघरी पोहोचली.



बालभवनचं काम संपूर्ण महाराष्ट्रभर वाढलंय, पसरलंय. शोभाताईंच्या सर्वसमावेशक, उपक्रमशील आणि विशाल दृष्टीचा फायदा गरवारे बालभवनला त्याच्या जन्मापासूनच मिळालाय. त्यांच्याबरोबर अनेक बालभवन कार्यकर्तेही तयार होत गेले. म्हणूनच सातत्यानी २५ वर्ष हे काम चालत राहिलं, समृध्द होत राहिलं.

बालभवनमधून बाहेर पडलेली मोठी मुलं आजही बालभवनमध्ये येऊन भेटून जातात. बालभवनच्या आठवणी जागवतात. अशाच एका मुलाला त्याची चित्रकला चांगली आहे ह्याचा शोध बालभवनमध्ये लागला. शाळेत त्याला चित्रकलेत नेहमी 'सी' ग्रेड मिळायची. आता तो चित्रकला विषय घेऊन पुढे आर्किटेक्चरला जाण्याचा विचार करतोय. अशी कितीतरी मुलं आहेत जी सांगतात की आज आम्ही ज्या क्षेत्रातला अभ्यास करतोय त्याची गोडी आम्हाला बालभवनने लावली आणि आज आनंदाने आपापल्या क्षेत्रात ती कार्यरत आहेत.

कविवर्य मंगेश पाडगावकर म्हणतात,

**''हासती मुले जिथे देश तो महान**
**नाचती मुले जिथे देश तो महान!'**

जो देश, जो समाज मुलांच्या भावनिक, मानसिक गरजेकडे, त्यांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष देतो तो देशच महान होतो. बालभवनच्या रौप्यमहोत्सवी वर्षात आपण एवढंच मागू या की, 'बालभवनचा हा वृक्ष असाच बहरू दे, पसरू दे, त्याला सौख्य, शांती लाभू दे!

❖ ❖ ❖